2 3 JUN 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे

## प्र-कुलगुरू प्रा.डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन; गुणवंतांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर योग्य वेळी ध्येय ठरवून त्या ध्येयाचा सातत्यपूर्ण पाठलाग करावा. ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या जवळ प्रयत्न, जिद्द, चिकाटी, धाडस, सातत्य, कष्ट आणि अभ्यास असायला हवा. आपण कोणतेही क्षेत्र निवडा; पण त्या क्षेत्रात आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवायला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचालित न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. पी. एस. पाटील बोलत होते.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थी व खेळाडू कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत; पण त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजेत. त्यासाठी विद्यापीठ कुठेही कमी पडणार नाही, याचीही ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख, स्वागत व अहवाल वाचन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थी आणि खेळाडूंचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार, संचालक वाय. एल. खाडे, डॉ. पी. के. पाटील, आर. डी. पाटील, आजीव सेवक सी. एम. गायकवाड, उदय पाटील, पर्यवेक्षक एस. एन. इनामदार, प्रबंधक श्रीमती एम. वाय. कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. वार्षिक पारितोषिक वितरणाचे वाचन जिमखानाप्रमुख प्रा. अमर सासने यांनी केले.

आभारप्रदर्शन उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. सर्जेराव पाटील, श्रीमती यू. के. गायकवाड यांनी केले. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'करिअरच्या संधी' विषयावरील कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा इंग्रजी अधिविभाग आणि केंद्रीय प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंग्रजी पदवीधरांसाठी करिअरच्या संधी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. कार्यशाळेत टोमॅटो एफएमचे आर. जे. जाहिद : रेडिओमधील करिअरच्या संधी, कोल्हापूरच्या जीएसटी उपायुक्त तेजस्विनी मोरे : नागरी सेवा व करिअर संधी, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रा. अनिल घुले : संशोधनातील करिअर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर : प्रसारमाध्यमांतील करिअर संधी, भारतीय वायुसेनेचे प्रख्यात ग्रुप कॅप्टन श्रीकांत बी. वालवडकर : संरक्षण सेवांतील करिअर संधी आणि आयईएलटीएस व टोफेल प्रशिक्षक व्हॅलेंटिना सोहेली : इंग्रजी भाषेच्या प्रावीण्य परीक्षा व त्यांचे महत्त्व यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे

■ प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर योग्यवेळी ध्येय ठरवून त्या ध्येयाचा सातत्यपूर्ण पाठलाग करावा. ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या जवळ प्रयत्न, जिद्द, चिकाटी, धाडस, सातत्य, कष्ट आणि अभ्यास असायला हवा. आपण कोणतेही क्षेत्र निवडा पण त्या क्षेत्रात आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवायला पाहिजे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज येथील वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अहवाल वाचन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थी आणि खेळाडूंचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्थेचे व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार, संचालक वाय. एल. खाडे, डॉ. पी. के. पाटील, आर. डी. पाटील, आजीव सेवक सी. एम. गायकवाड, उदय पाटील, पर्यविक्षक एस. एन. इनामदार, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते. वार्षिक पारितोषिक वितरणाचे वाचन जिमखाना प्रमुख प्रा. अमर सासने यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. सर्जेराव पाटील, श्रीमती यु. के. गायकवाड यांनी केले.